नमुना क्रमांक 1

(नियम 4 व 5 पहा)

## जिल्हाधिकारी, जिल्हा अमरावती यांचे आदेश

क्रमांक-कक्ष-20/स्थानि/अका-1/कावि 1634 /2017-18 महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम, 1966 यातील नियम 4 आणि 5 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी अभिजीत बांगर, अमरावती जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ 1 मध्ये विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या मतदार प्रभागामधून **चिखलदरा नगरपालिकेसाठी घेण्यात येणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या व चिखलदरा नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या थेट निवडणुकासंबंधात** पुढील नेमणुका व तारखा निश्चित करीत आहे. तसेच अध्यक्षांच्या निवडणूक संबंधात महाराष्ट्र नगरपरिषद अध्यक्ष पदाची थेट निवडणूक नियम, 2016 मधील नियम क्रं. 9 अन्वये

(अ) स्तंभ 2 मध्ये विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या निर्वाचन अधिकाऱ्याचे किंवा सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव (स्तंभ 1 मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या नगर परिषदांसमोर निर्दीष्ट करण्यात आलेले नाव, ज्याचा यापुढे "नगरपरिषदेसमोर" असा उल्लेख करण्यात आला आहे)

(ब) स्तंभ 3 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी अखेरची तारीख व वेळ असेल;

(क) स्तंभ 5 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची तारीख व वेळ असेल;

(ड) स्तंभ 6 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख ही नामनिर्देशनपत्रे छाननी करण्याची तारीख व वेळ असेल;

(ई) स्तंभ 7 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख ही नामनिर्देशनपत्रे छाननी करण्याची उमेदवारी यादी प्रसिद्ध करण्याची तारीख असेल

(फ) स्तंभ 6 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख विधीग्राह्य रीतीने नामनिर्देशीत केलेली उमेदवाराची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख असेल;

(ग) स्तंभ 8 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख ही उमेदवारी मागे घेण्याची अखेरची तारीख असेल

(ह) स्तंभ 9 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख ही निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करावयाची तारीख असेल;

(आय) स्तंभ 10 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख किंवा तारखा आणि वेळ या मतदान ज्या तारखांना आणि ज्या वेळात घ्यावयाचे असेल ती तारीख/त्या तारखा व वेळ असेल/असतील.

(जे) स्तंभ 11 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही मतमोजणी तारीख व वेळ असेल

(के) स्तंभ 12 मध्ये (प्रभागासमोर) विनिर्दीष्ट करण्यात आलेली जागा मतमोजणी संबंधीची जागा असेल

## अनुसूची

| नगरपरिषदेचे नांव | निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव | सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्याचे नाव | नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची जागा | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीची तारीख | नामनिर्देशनपत्राची छाननी व मागे घेण्याची जागा | विधीग्राह्य रितीने नामनिर्दीष्ट करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | उमेदवारी मागे घेण्याची शेवटची तारीख | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची व चिन्ह वाटपाची तारीख | मतदान ज्या तारखेस किंवा तारखा आणि ज्या वेळी घेण्यात येईल ती तारीख किंवा तारखा व वेळ | मतमोजणीची तारीख व वेळ | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2-अ | 2-ब | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| नगर परिषद चिखलदरा प्रभाग क्रमांक 1 ते 8 तसेच अध्यक्ष पदाची थेट निवडणुक | श्री. विजय राठोड (भाप्रसे) उपविभागीय अधिकारी, धारणी | श्री. प्रशांत रोडे, मुख्याधिकारी, नगर परिषद चिखलदरा | 18-11-2017 (शनिवार) ते 24-11-2017 (शुक्रवार) 19-11-2017 (रविवार) सोडुन (स. 11-00 ते दु. 3-00 पर्यत) | पालिका भवन, नगर परिषद कार्यालय चिखलदरा | 25-11-2017 (शनिवार) सकाळी 11-00 पासुन | पालिका भवन, नगर परिषद कार्यालय चिखलदरा | 25-11-2017 (शनिवार) सकाळी 11-00 पासुन | 30-11-2017 (गुरुवार) दुपारी 3-00 वाजेपर्यंत (अपिल नसल्यास) अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पर्वी | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी | 13-12-2017 (बुधवार) सकाळी 7-30 पासून ते सायंकाळी 5-30 पर्यंत | 14-12-2017 (गुरुवार) सकाळी 10-00 वाजल्यापासून | पालिका भवन, नगर परिषद कार्यालय चिखलदरा |

टिप - 1. निर्वाचन अधिकाऱ्याच्या नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या किंवा नाकारण्याच्या निर्णयाविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याच्या शेवटच्या तारखेसाठी महाराष्ट्र नगर पालिका निवडणुक नियम, 1966 यातील नियम 15 पहा

दिनांक - 14-11-2017

ठिकाण - अमरावती

जिल्हाधिकारी, अमरावती